# शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग अहवाल २०२३-२४ – (वरिष्ठ विभाग)

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग हा अंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी समाधान कारक झाली. याच बरोबर अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत महाविद्यालयाच्या एकूण ३७ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला व खेलो इंडिया इंटर यूनिवर्सिटी स्पर्धेत ८ खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

महाविद्यालयाने मुले व मुली असे एकूण ६ सांघिक खेळांमध्ये सहभागही नोंदविला व शिवाजी विद्यापीठ विभागीय स्पर्धेत १ विजेतेपद, ३ उपविजेतेपद मिळविले त्याच प्रमाणे शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धांमध्ये २ विजेतेपद व ३ उपविजेतेपद व १ तृतीय क्रमांक मिळविला. यामध्ये क्रिकेट महिला अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत विजेता, फूटबॉल पुरुष अंतर विभागीय विजेता व विभागीय स्पर्धेत उपविजेता, सॉफ्ट बॉल पुरुष अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत उपविजेता, बेस बॉल पुरुष अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत उपविजेता, कुस्ती महिला अंतर विभागीय उपविजेता तसेच हॉकी महिला अंतर विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला आहे. त्याच प्रमाणे खुल्या राज्य व राष्ट्रीय स्पर्धेतही महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी केली आहे.

तसेच या वर्षी शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाने ४ शिबिरांचे आयोजन व ६ स्पर्धांचे आयोजन ही उत्कृष्ठ रित्या केले आहे. त्याचबरोबर विविध खेळातील पदक विजेत्या व विशेष प्रावीण्य प्राप्त खेळाडूंचा सत्कार समारंभाचे ही आयोजन वेळोवेळी करण्यात आले. अंतरराष्ट्रीय योग दिन व राष्ट्रीय क्रीडा दिन ही विविध उपक्रमांनी साजरे करण्यात आले.

## अंतर राष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय कामगिरी:

- व्हेलंसिया, स्पेन येथील अंतरराष्ट्रीय ज्युदो सराव शिबिरासाठी **कु. समीक्षा शेलार** हिची भारतीय संघात निवड व सहभाग.
- चेन्नई, तमिळनाडू येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत **ऋतुराज पाटील** याने १०५ किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले.
- अमृतसर येथे झालेल्या साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत **कु. समीक्षा शेलार** हिने ७० किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले
- चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्विमिंग स्पर्धेत **पृथ्वीराज डांगे** याने व्ययक्तिक १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये कास्य पदक व गुवाहाटी येथील ४ थ्या खेलो इंडिया आंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक पटकाविले.
- कुरुक्षेत्र येथे झालेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ शूटिंग स्पर्धेत **कु. फिजा देसाई** हिने व्ययक्तिक व सांघिक मध्ये कास्य पदक पटकाविले.
- चांदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ कायकिंग स्पर्धेत **कु. धनश्री धोकटे** हिने सांघिक मध्ये कास्य पदक पटकाविले.

## शासकीय सेवेत विविध पदावर निवड झालेले खेळाडू :

१. कु. जान्हवी सावर्डेकर (पॉवर लिफ्टिंग) – इंडियन रेल्वे – सीनियर टी.सी.
२. संदीप यादव (सॉफ्टबॉल) – महाराष्ट्र शासन – उप शिक्षणाधिकारी
३. तेजस गावडे (कुस्ती) - मुंबई पोलिस – कॉन्स्टेबल
४. सुशांत निकम (कबड्डी) – मुंबई अग्निशामक दल – अग्निशामक
५. अभिजीत विचारे (हॉकी) – मुंबई पोलिस – कॉन्स्टेबल

## अंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय प्रावीण्य प्राप्त खेळाडू :

**१)** कु. समीक्षा शेलार (ज्युदो व कुस्ती)

- **व्हेलंसिया, स्पेन येथील अंतरराष्ट्रीय** ज्युदो सराव शिबिरासाठी **कु. समीक्षा शेलार** हिची भारतीय संघात निवड
- अमृतसर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सहभाग
- अमृतसर येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत **सुवर्ण पदक**
- ५० व्या राज्य अजिंक्यपद ज्युदो स्पर्धेत वरिष्ठ व कनिष्ठ या दोन्ही गटात सुवर्ण पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ज्युदो स्पर्धेत सुवर्ण पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत रौप्य पदक

२) कु. फिजा देसाई (शूटिंग)

- कुरुक्षेत्र येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ १० मीटर पिस्टल स्पर्धेत **कास्य पदक**
- फरीदाबाद येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ २५ मीटर पिस्टल स्पर्धेत सहभाग
- कुरुक्षेत्र येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ १० मीटर पिस्टल स्पर्धेत **कास्य पदक**
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय २५ मीटर पिस्टल द्वितीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय १० मीटर पिस्टल चतुर्थ क्रमांक

३) पृथ्वीराज डांगे (स्विमिंग)

- चेन्नई येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक **कास्य पदक**
- गोवाहाटी येथील खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक **कास्य पदक**
- चेन्नई येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत१०० व २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक **कास्य पदक**
- गोवा येथील ३७ व्या नॅशनल गेम्स स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ५ सुवर्ण, २ रौप्य व १ कास्य पदक
- शिवाजी विद्यापीठ विभागीय ५ सुवर्ण, २ रौप्य व १ कास्य पदक

४) कु. धनश्री धोकटे (कायकिंग)

- चांदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ कायकिंग स्पर्धेत **कास्य पदक**
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत रौप्य पदक

५) प्रभू पवार (फूटबॉल)

- जालंदर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सातवा क्रमांक
- आसाम येथील खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- मुंबई येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- रायगड येथील अश्वमेध क्रीडा मोहोत्सव अंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम व विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

६) प्रथमेश हेरेकर (फूटबॉल)

- जालंदर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सातवा क्रमांक
- आसाम येथील खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- मुंबई येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- रायगड येथील अश्वमेध क्रीडा मोहोत्सव अंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम व विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

७) रोहित पवार (फूटबॉल)

- जालंदर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सातवा क्रमांक
- आसाम येथील खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- मुंबई येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- रायगड येथील अश्वमेध क्रीडा मोहोत्सव अंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम व विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

८) यश देवणे (फूटबॉल)

- जालंदर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सातवा क्रमांक

- आसाम येथील खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- मुंबई येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- रायगड येथील अश्वमेध क्रीडा मोहोत्सव अंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम व विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**९)** स्वयम साळोखे (फूटबॉल)

- जालंदर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सातवा क्रमांक
- मुंबई येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम व विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**१०)** यशराज कांबळे (फूटबॉल)

- जालंदर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सातवा क्रमांक
- मुंबई येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत प्रथम व विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**११)** कु. सौम्यलता बिराजदार (क्रिकेट)

- उडपी येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- मध्य प्रदेश येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**१२)** कु. सानिका लाड (क्रिकेट)

- उडपी येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- मध्य प्रदेश येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**१३)** कु. स्नेहा साळे (क्रिकेट)

- उडपी येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- मध्य प्रदेश येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**१४)** कु. अंकिता गायकवाड (क्रिकेट)

- उडपी येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- मध्य प्रदेश येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत रौप्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय व विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

१५) कु. सिद्धी जाधव (हॉकी)

- ग्वाल्हेर येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ संघाच्या कर्णधार पदी निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

१६) कु. पूर्वा पाटील (हॉकी)

- ग्वाल्हेर येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

१७) कु. समीक्षा शेगुंशी (हॉकी)

- ग्वाल्हेर येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक

१८) सुशांत हतकर (शूटिंग)

- फरीदाबाद येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ ५० मीटर स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ५० मीटर स्पर्धेत तृतीय क्रमांक

१९) यश पाडलोसकर (शूटिंग)

- फरीदाबाद येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ ५० मीटर स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ५० मीटर स्पर्धेत प्रथम क्रमांक

२०) ऋषिकेश पाटील (शूटिंग)

- कुरुक्षेत्र येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ १० मीटर स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय १० मीटर स्पर्धेत चतुर्थ क्रमांक

२१) ऋषिराज पोवार (फेन्सिंग)

- अमृतसर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- औरंगाबाद येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत रौप्य पदक

२२) कु. सानिका मोरे (फेन्सिंग)

- अमृतसर येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- औरंगाबाद येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत कास्य पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत रौप्य पदक

२३) आदित्य जाधव (बॉक्सिंग)

- मोहाली, पंजाब येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

२४) संदेश काटकर (बॉक्सिंग)

- मोहाली, पंजाब येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

२५) प्रणव रोडे (बॉक्सिंग)

- मोहाली, पंजाब येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

२६) ऋषिकेश काशीद (वेट लिफ्टिंग)

- मोहाली, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- आंध्र प्रदेश मोहाली, पंजाब येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

२७) कु. निकिता माल्लाडे (फूटबॉल)

- ग्वाल्हेर येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग

२८) कु. अंकिता चेचर (कबड्डी)

- मध्य प्रदेश येथील वेस्ट झोन अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग

२९) कु. श्रद्धा कुंभार (कुस्ती व ज्युदो)

- चंडीगढ, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सहभाग
- चंडीगढ, पंजाब येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ज्युदो स्पर्धेत सुवर्ण पदक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत कास्य पदक

३०) आदित्य पाटील (ज्युदो)

- अमृतसर, पंजाब येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सहभाग
- अमृतसर, पंजाब येथील साऊथ वेस्ट झोन अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ज्युदो स्पर्धेत सुवर्ण पदक

३१) कु. सरिता सावंत (पॉवर लिफ्टिंग)

- चेन्नई, तमिळनाडू येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेस निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

३२) ऋतुराज पाटील (पॉवर लिफ्टिंग)

- चेन्नई, तमिळनाडू येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत **सुवर्ण पदक**
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

३३) शामसुंदर कांबळे (पॉवर लिफ्टिंग)

- चेन्नई, तमिळनाडू येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

३४) सुमित जाधव (पॉवर लिफ्टिंग)

- चेन्नई, तमिळनाडू येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

३५) बाबासो कांबळे (पॉवर लिफ्टिंग)

- चेन्नई, तमिळनाडू येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

३६) रितेश पाटील (पॉवर लिफ्टिंग)

- चेन्नई, तमिळनाडू येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक

**३७)** कु. पल्लवी जाधव (ज्युदो/कुस्ती)

- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय ज्युदो स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**३८)** विनायक पाटील (सोफ्टबॉल)

- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**३९)** अजय कदम (बेसबॉल)

- गोवाहाटी, आसाम येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**४०)** आकाश कदम (बेसबॉल)

- गोवाहाटी, आसाम येथील अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**४१)** आदित्य पाटील (बेसबॉल)

- गोवाहाटी, आसाम येथील आखील भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड
- शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक
- शिवाजी विद्यापीठ विभागीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक

कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील
क्रीडा विभाग प्रमुख (वरिष्ठ)

## शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागातील विविध उपक्रम :

## शिबीर व कार्यशाळा आयोजन :

१) **१५ दिवासीय योग शिबीर २०२३**

महाविद्यालयाच्या क्रीडा व एन.सी.सी. विभाग आणि योग विद्या धाम यांच्या संयुक्त विद्यमाने MoU अंतर्गत दिनांक ०५ ते २० जून २०२३ रोजी अंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त १५ दिवासीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास आर्ट ऑफ लिविंगचे योग प्रशिक्षक प्रा. रणजीत पाटील यांनी योग आसन प्रात्यक्षिकसह त्याचे शरीराला होणारे फायदे विषद केले. या शिबिरास विद्यार्थी, खेळाडू व एन.सी.सी. कॅडेट उपस्थित होते. या शिबिराचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

२) **महिला स्व संरक्षण कार्यशाळा**

महाविद्यालयाचा क्रीडा विभाग व स्त्री व्यक्तिमत्व विकास समितिच्या वतीने दिनांक १३ जुलै २०२३ रोजी महिला स्व संरक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या वेळी कुंफु वुशू असोसिएशनचे अध्यक्ष श्री. डॉ. संदीप पाटील, प्रशिक्षक श्री. उमेश चौगुले, माजी विद्यार्थी अतुल साळोखे व त्यांच्या सहकाऱ्यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींना समाजात अचानक ऊदभवणाऱ्या समस्यांवर कशी मात करावी व स्वत: चे स्वरक्षण कसे करावे या बद्दल प्रात्यक्षिकसह माहिती दिली. सर्व प्रशिक्षकांचा सत्कार प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांच्या हस्ते करण्यात आला या वेळी सर्व महिला प्राध्यापिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या समारंभाचे नियोजन डॉ. सौ. एन.डी. काशीद पाटील व डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

३) **महाविद्यालयीन क्रीडा सराव शिबीर उद्घाटन समारंभ**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक २२ ऑगस्ट २०२३ रोजी शिवाजी विद्यापीठ विभागीय व अंतर विभागीय व्ययक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघाचा व खेळाडूंच्या सराव शिबिराचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर व कबड्डी प्रशिक्षक श्री संदीप पाटील यांच्या हस्ते कबड्डी म्याटचे पूजन श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी शिक्षक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या संघातील खेळाडू उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील व प्रा. प्रशांत मोटे यांनी केले.

४) **स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत आरोग्य तपासणी शिबीर**

वेणुताई चव्हाण मेडिकल कॉलेज व महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या सयुक्त विद्यमाने स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी संस्थेच्या सर्व शाखांतर्गत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेश कागले व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये रक्त दाब, संधिवात, अस्थमा, शुगर तपासणी, त्वचा रोग तसेच इतर रोगांवर होमिओपॅथीक उपचार व तपासणी करण्यात आल्या. त्याच बरोबर वेणुताई चव्हाण मेडिकल कॉलेजच्या वतीने मोफत होमिओपॅथी औषधे ही देण्यात आली. या वेळी संस्थेच्या सर्व शाखांतर्गत ११० कर्मचाऱ्यांनी शिबिराचा लाभ घेतला. या शिबिराचे आयोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

## विविध दिन साजरे करण्यात आले :

१) **अंतरराष्ट्रीय योग दिन २०२३**

महाविद्यालयाच्या क्रीडा व एन.सी.सी. विभाग आणि योग विद्या धाम यांच्या संयुक्त विद्यमाने MoU अंतर्गत दिनांक २१ जून २०२३ रोजी अंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या समारंभास प्रमुख अतिथि म्हणून आचार्य योगेश्वर आनंद अवधूत व प्रा. आर. एस. पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण हे होते. आचार्य योगेश्वर आनंद अवधूत यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग व मेडिटेशन करणे किती गरजेचे आहे हे समजावून संगितले. तसेच प्रा. आर. एस. पाटील यांनी योग आसनांसह त्याचे शरीराला होणारे फायदे विषद केले. या समारंभास सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**२) राष्ट्रीय क्रीडा दिन २०२३**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन निमित्य दिनांक २९ ऑगस्ट २०२३ रोजी व्याखाणाचे आयोजन करण्यात आले. या कर्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अंतर राष्ट्रीय वेट लिफ्टिंग खेळाडू शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित आयकर अधिकारी सौ. वर्षा पत्की पाटील यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व्याख्याता सौ. वर्षा पत्की पाटील यांनी आपला यशाचा जीवनपट उलघडताणा कठीण परिस्थितीतही अतिउच शिखरपर्यंत कसे पोहचता येते याचे व्याखाना द्वारे विशद केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांनी मेजर ध्यानचंद यांचे खेळातील

विजेते पदाचा प्रवास विषद केला. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

## शिष्यवृती व प्रावीण्यप्राप्त खेळाडूंचा सत्कार समारंभ :

**१) शिवाजी विद्यापीठ क्रीडा शीषवृती प्राप्त अंतरराष्ट्रीय पॅरा जलतरन खेळाडू आदित्य पाटील सत्कार समारंभ**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग व कोल्हापूर पॅराओलंपिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने Linkages अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या वतीने क्रीडा क्षेत्रातील अंतर राष्ट्रीय खेळाडूंना देण्यात आलेला प्रोत्साहनपर शीषवृती रोख रु. ५०,०००/- हे पॅरा जलतरन खेळाडू आदित्य अजित पाटील याला मिळाल्याबद्दल दिनांक ०२ ऑगस्ट २०२३ रोजी त्याचा सत्कार मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर, अधीक्षक श्री. मनीष भोसले व इतर मान्यवराच्या हस्ते करण्यात आला. आदित्य पाटील याने अंतर राष्ट्रीय स्पर्धेत तसेच राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत आपली कसब दाखविल्यामुळेच त्याची दाखल घेवून विद्यापीठाने ही शीषवृती दिल्याचे मा. प्राचार्यसो यांनी जाहीर केले व पुढील काळात अजून प्रगति करण्याबद्दल सर्वांच्या वतीने शुभेच्या दिल्या. या समारंभाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**२) अंतर महाविद्यालयीन आमदार चषक रस्सीखेच स्पर्धा विजेत्यांचा सत्कार समारंभ**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक ०७ ऑगस्ट २०२३ रोजी अंतर महाविद्यालयीन आमदार चषक रस्सीखेच स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांकासह रोख रु. १०,०००/- व मानाचा चषक मिळविल्याबद्दल मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर व आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर यांच्या हस्ते पुष्पगुछ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**३) पोलिस पदी निवड झालेल्या खेळाडुंचा सत्कार समारंभ**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक ०७ सप्टेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुंबई पोलिस पदावर भरती झालेला हॉकी खेळाडू अभिजीत विचारे व कुस्तीपट्टू पैलवान तेजस गावडे यांच्या सत्कार मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर यांचा हस्ते पुष्पगुछ देवून करण्यात आला. या समारंभाचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

## स्पर्धा सयोजन :

**१) क्रीडा दिन निम्मीत रस्सी खेच स्पर्धा**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन निमित्य दिनांक २९ ऑगस्ट २०२३ रोजी पारंपारिक खेळ प्रचार व प्रसार होण्यासाठी अंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून अंतर राष्ट्रीय वेट लिफ्टिंग खेळाडू शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित आयकर अधिकारी सौ. वर्षा पत्की पाटील या होत्या. या स्पर्धेमध्ये ११ वी ते तृतीय वर्षातील प्रत्येक विभागातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर, शिक्षक, विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते. या स्पर्धेचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**२) शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय शूटिंग स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय शूटिंग स्पर्धेचे आयोजन १० ते ११ नोव्हेबर २०२३ रोजी राजे संभाजी नेमबाजी प्रशिक्षण केद्र, दुधाळी मैदान येथे करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन कोल्हापूर मेन अँड विमेन रायफल असोसिएशनचे अध्यक्ष मा. श्री. अजित खराडे व सचिव श्री. रमेश कुसाळे यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमास इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. एन.एस.जाधव, पंच पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील एकूण १५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे नियोजन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**३) स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत रस्सी खेच स्पर्धा**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी पारंपारिक खेळ प्रचार व प्रसार होण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांतर्गत इयत्ते नुसार विविध गटात रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन अधीक्षक श्री. मनीष भोसले सर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या स्पर्धेमध्ये बालवाडी ते तृतीय वर्षातील प्रत्येक विभागातील एकूण १३ संघांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विजेत्या स्पर्धकांना रोख परितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

४) **स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत बॉडी बिल्डिंग स्पर्धा**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व स्व. विजयराव बोंद्रे बापू जयंती मोहोत्सव निम्मीत दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी संस्थेच्या सर्व शाखांतर्गत बॉडी बिल्डिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार विजेते अंतर राष्ट्रीय खेळाडू विजय मोरे, अधीक्षक श्री. मनीष भोसले सर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले. या वेळी आय.कयू.ए.सी. समन्वयक डॉ. आर. डी. मांडणीकर, प्रा. डॉ. डी. के. वाळवी व इतर मान्यवर उपस्थितीत होते. या स्पर्धेमध्ये इयत्ता १० वी ते तृतीय वर्षातील एकूण १३ खेळाडूंनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विजेत्या स्पर्धकांना मानाचा चषक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

५) **शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय बेस्ट फिजिक (बॉडी बिल्डिंग) स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय बेस्ट फिजिक (बॉडी बिल्डिंग) स्पर्धेचे आयोजन दिनांक ०६ व ०७ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन गुरुवर्य बिभिषण पाटील सर, संस्थेचे चेअरमन मा. मानसिंग दादा बोंद्रे व शिवछत्रपती पुरस्कार विजेते विजय मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर होते. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील एकूण १०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

६) **शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धा संयोजन**

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन दिनांक १६ व १७ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन गुरुवर्य बिभिषण पाटील सर व शिवछत्रपती पुरस्कार विजेती कु. शुक्ला बीडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर होते. स्पर्धेसाठी सपूर्ण शिवाजी विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील एकूण १५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे नियोजन प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील
क्रीडा विभाग प्रमुख (वरिष्ठ)